Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 | EPABX -25705000 Fax : 25665807 | Secretary(P) : 25651750

महत्वाचे /तातडीचे

जा. क्र.रा.मं./परीक्षा-७/348
पुणे ४११ ००४.
दिनांक -१९/०१/२०१९

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे

विषय :- चित्रकला परीक्षेमध्ये प्राविण्य मिळविणाऱ्या इ.१० वी च्या विद्यार्थ्यांना सवलतीचे वाढीव गुण देण्याबाबचा प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देणेबाबत..

संदर्भ :- १. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१६/प्र.क्र.२०२/एसडी-२ दि.२४/११/२०१७

२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचेकडील पत्र क्र.संकीर्ण -२०१९/प्र.क्र.१५/ एसडी-२ दि.१८ जानेवारी, २०१९

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सूचित करण्यात येते की, शासन निर्णय दिनांक २४/११/२०१७ नुसार चित्रकलेचे अतिरिक्त गुणांचे प्रस्ताव दिनांक १५ जानेवारी २०१९ पर्यंत विभागीय मंडळाकडे सादर करणे आवश्यक आहे. तथापि सदर परीक्षेचा निकाल न लागल्याने काही शिक्षक संघटनांनी चित्रकलेचे प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देण्याबाबत केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

त्यास अनुसरून शासनाने संदर्भिय क्र. २ च्या पत्रान्वये फक्त चित्रकलेचे प्रस्ताव विभागीय मंडळाकडे सादर करण्यासाठी दिनांक २५ जानेवारी २०१९ पर्यंत मुदत वाढविण्यात आली आहे. (संदर्भ क्र.२ च्या शासन पत्राची प्रत सोबत जोडली आहे. )

तरी उपरोक्त शासन पत्रानुसार सर्व विभागीय मंडळांनी योग्य ती कार्यवाही करावी. सदर मुदतवाढ आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व माध्यमिक शाळांच्या निदर्शनास आणून देवून त्याप्रमाणे मुदतीत कार्यवाही करण्याबाबत सर्व संबंधितांना सूचित करावे. तसेच आपल्या स्तरावरुन सदरबाबत प्रसिध्दी देणेत यावी. कोणताही पात्र विद्यार्थी सदर गुणांच्या सवलतीपासून वंचित राहणार नाही याची सर्व संबंधितांनी दक्षता घ्यावी.

सचिव
राज्यमंडळ, पुणे-४.

---

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, राजेंद्रनगर, कोल्हापूर -४१६ ००४.**

क्र.कोविमं/शाखा माध्य परीक्षा/कला सवलत/ 2813
कोल्हापूर ४१६००४.
दिनांक:-१९/०१/२०१९

प्रति,
सर्व मान्यताप्राप्त शाळा प्रमुख
सातारा, सांगली व कोल्हापूर.

**फक्त चित्रकला** क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) **मार्च-१९ परीक्षेमध्ये सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबातचे प्रस्ताव सादर कराण्यास मुदतवाढ देण्याबाबतच्या** राज्य मंडळाचे जा.क्र.रा.मं./परीक्षा-७/३४८ दि.१९/०१/२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविल्याप्रमाणे सर्व शाळाप्रमुखांनी नोंद घेऊन कार्यवाही करावी.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.

## महाराष्ट्र शासन

| तात्काळ<br>mail - govind.kamble@nic.in | क्रमांक:- संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१५/एसडी-२<br>शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,<br>मादाम कामा मार्ग, हुतात्मा<br>राजगुरु चौक,मंत्रालय, मुंबई-३२<br>दिनांक :- १८ जानेवारी, २०१९ |
|---|---|

प्रति,
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे

**विषय** :- शास्त्रीय कला, चित्रकला इ. मध्ये प्राविण्य मिळवणाऱ्या इ.१० वी च्या विद्यार्थ्यांना सवलतीचे वाढीव गुण देण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देणेबाबत.

**संदर्भ** :- सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचे पत्र दि.११ जानेवारी,२०१९.

शासन निर्णय दि.२४.११.२०१७ नुसार चित्रकलेसाठी अतिरिक्त गुणांचे प्रस्ताव दि.१५ जानेवारी, २०१९ पर्यंत विभागीय मंडळांकडे सादर करणे आवश्यक आहे. तथापि, काही कला शिक्षक संघांनी सन २०१८-१९ च्या चित्रकला ग्रेड परिक्षांचा निकाल जाहिर न झाल्याने चित्रकलेसाठीचे अतिरिक्त गुणांचे प्रस्ताव विद्यार्थी व शाळा विहित मुदतीत सादर करु शकत नसल्याने सदर प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देण्याची विनंती संदर्भाधीन पत्रान्वये आपण शासनाकडे केली आहे. सदर विनंती विचारात घेऊन, चित्रकलेसाठी अतिरिक्त गुणांचे प्रस्ताव विभागीय मंडळांकडे सादर करण्याची मुदत दि.२५ जानेवारी, २०१९ पर्यंत वाढविण्यात येत आहे.

(डॉ.सुवर्णा खरात)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

Scanned by CamScanner